**एस.सी.सी.क्र.३७१/२०२२**
**सरकार वि. रोहीदास**
**नि.क्र.१६**

**अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्र.२ यांचा पुरावा**.

मी याद्वारे शपथपूर्वक निवेदन करतो की,

माझे नांव – बाबासाहेब रावसाहेब सावंत,
वय – ४८ वर्षे , व्यवसाय - शेती,
राहणार – देवटाकळी, ता. शेवगाव जि.अहमदनगर

सरतपासणी सहा**.** सरकारी वकील **श्रीमती पी.आर.गिते यांचेमार्फतः**–

०१. दि. ११.०२.२०२२ रोजी पोलीसांनी मला पंचनाम्याकामी देवटाकळी येथील गट क्र.३५६ मध्ये बोलावले होते. पंचनामा हा झालेल्या वादा बाबतचा होता. पोलीसांनी मला सही करायला लावली. आता साक्षीदाराला पंचनामा नि.क्र.१५ दाखवण्यात आला. तो माझ्या समक्ष लिहीण्यात आला होता. त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे.

०२. त्यावेळी पोलीसांनी माझ्या समक्ष रोगरची बाटली जप्त केली. ती बॉटल मला दाखवल्यास मी ओळखु शकतो. आता मला आर्टीकल अ बॉटल दाखवण्यात आली. ती तीच आहे.

उलटतपास आरोपीतर्फे वकील श्री**.**के**.**के**.**गलांडे यांचेमार्फतः-

०३. माझे १२ वी पर्यंत शिक्षण झाले आहे. मला गट क्र.२५६ च्या चतुःसिमा सांगता येणार नाहीत. त्या जमीनीत कांद्याचे पीक होते. मी स्वतःहुन त्याठिकाणी गेलो होतो. त्याठिकाणी तंटा चालु असल्यामुळे मी बघण्याकरीता गेलो होतो. तेथे वाद झाला होता. मला घटनास्थळ कोणी दाखविले नाही. मी गेलो त्यावेळी पोलीस व ईतर लोक होते. कोण पोलीस होते व कोण लोक होते हे मला सांगता येणार नाही. ती दिवसाची १२.०० ते ०१.०० ची वेळ होती. हे म्हणणे खरे आहे की, पोलीसांनी माझी सही घेतली व पंचनामा झाला असे

सांगितले या व्यतिरिक्त त्याठिकाणी ईतर काही घडले नाही. पंचनाम्यात काय लिहीले हे मला सांगता येणार नाही. मी पोलीसांच्या सांगण्याप्रमाणे सही केली. हे म्हणणे खरे आहे की, पोलीस असल्यामुळे मी देखील कशावर सही घेता हे विचारले नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी आजरोजी खोटी साक्ष देत आहे.

उलटतपास पुर्ण.

फेरतपास नाही

श्रवणोत्तर स्वीकृति

KULKARNI DATTATRAYA RAMESH

Digitally signed by KULKARNI DATTATRAYA RAMESH
Date: 2026.03.09 18:08:18 +0530

दिनांक- ०९.०३.२०२६

(डी.आर.कुलकर्णी)
प्रथमवर्ग न्यायदंडाधीकारी,
कोर्ट नं. ३ शेवगाव